
दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १२१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.१३ डिसेंबर २०२४




## दोषींवर कठोर शिक्षेच्या मागणिचे नायब तहसिलदारांना निवेदन

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**



**दि.१२, मुदखेड (नांदेड) :** परभणी शहरात १० डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालया लगत असलेल्या डा.बाबासाहेब आंबेडकर स्मारका समोर असलेल्या भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची एका समाजकंठकाने मोडतोड करुन बहुजन समाजासह प्रशासनापूढे मोठे आव्हानच उभं केले.समाजात जातीय तेढ निर्माण करणाऱ्यां प्रकरणांचे पडसाद आख्ख्या देशात उमटले असता मुदखेड येथील बौद्ध समाजाने देखील हे कुकूत्ये करणाऱ्यां समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्यात यावी हा संदेश गृहमंत्रालयाला कळवा म्हणून समस्त बौद्ध समाजाच्या वतीने या आशयाचे निवेदन मुदखेडचे नायब तहसीलदार मारोतराव जगताप यांना देण्यात आले.

तसेच या घटनेच्या निषेधार्थ मुदखेड शहरातील व्यापाऱ्यांनी प्रतिसाद देत आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला त्याचप्रमाणे परभणी ते भारतीय संविधानाची विटंबना करणाऱ्या व षडयंत्र रचणाऱ्याचा विरोधी चौकशी व करून संबंधिताविरुद्ध तातडीने कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी मुदखेड शहर व तालुक्यातील तमाम आंबेडकर जनतेच्या वतीने तीव्र शब्दात निषेध व्यक्त करण्यात आला या घटनेमुळे आंबेडकर जनतेमध्ये मोठा रोष निर्माण झालेला असून तमाम भारतीयांचे अस्मिता असलेल्या संविधानाच्या प्रतिकृती ची विटंबना करणाऱ्या इसमास तातडीने अटक करून त्यास कठोर शासन करण्यात यावी यासाठी षडयंत्र रचणाऱ्याचा देखील शोध घेऊन त्याच्याविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी असे निवेदनात नमूद करण्यात आले यावेळेस उपस्थित असलेले भंते गगन बोधी यांच्यासह आंबेडकरी अनुयायांची उपस्थिती होती.

## लोकमान्य नगरात कपड्याच्या दुकानाला भीषण आग

**अक्षराज : विकास दळवी**



**दि.११, ठाणे :** लोकमान्य नगरमधील गजबजलेल्या आणि वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या लाकडी पुलावरील तीन दुकानात भीषण आग लागल्याची दुर्घटना बुधवार, दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजी पहाटेच्या सुमारास घडली. यामध्ये लाखो रूपयांचे कपडे, पैसे, कागदपत्रे जळून खाक झाले. भल्या पहाटे ४ ते ५ च्या दरम्यान दुकान बंद असल्याने जीवितहानी टळली असून या आगीचे कारण शॉर्टसर्किट असल्याचे सांगितले जात आहे. लोकमान्य नगरच्या लाकडी पुलावरील मार्केट वर्दळीचे ठिकाण आहे. या ठिकाणी लहानसहान गल्ल्या असून हा अत्यंत दाटीवाटीची परिसर आहे. या ठिकाणचा रस्ताही खुपच अरूंद आहे. वाहनांची, माणसांची, फेरीवाल्यांची ये-जा तसेच रस्त्यावर होणारी वाहनांची पार्किंग यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात नेहमी वाहतूक कोंडी होते. या बाजारपेठेतील चामुंडा, पवार मॅचिंग सेंटर, रामदेव गादी या कपड्यांच्या दुकानाला बुधवार, दिनांक ११ डिसेंबर आग लागली. या आगीने क्षणातच उग्र रूप धारण केले. या आगीची माहिती समजताच ठाणे महापालिका अग्निशामक दल या ठिकाणी पोहोचले.तत्पूर्वी या दुकानाचे मालक ही या ठिकाणी वास्तव्यास असल्याने त्यांनी ही आग विझविण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा केली. संबंधित दुकान मालकांचा संपुर्ण परिवार या ठिकाणी वास्तव्याला होते. त्यांच्यासाठी हा प्रसंग अत्यंत धोकादायक होता. वर्तकनगर पोलीस ही घटनास्थळी दाखल होऊन या ठिकाणच्या मदतकार्यात सहकार्य केले. या घटनेची नोंद वर्तकनगर पोलीस ठाण्यात केली गेली आहे.

## पं. समिती कार्यालयात शेतकरी नागरिकांची कामे खोळंबली

**अक्षराज : मांगीलाल राठोड**

**दि.१२, किनवट (नांदेड) :** किनवट येथील गटविकास अधिकारी पंचायत समिती कार्यालयात पूर्ण वेळ उपस्थित राहत नसल्याने शेतकऱ्यांसह नागरिकांना घराकडे काम न होता परतावे लागत आहे. तेव्हा संबंधित वरिष्ठांनी याची गंभीर दखल घेऊन गट विकास अधिकाऱ्यांना पंचायत समिती कार्यालयात पूर्ण वेळ थांबण्याची तंबी देण्यात यावी. अशी मागणी नागरीकातून व सरपंचातून आहे. किनवट पंचायत समिती कार्यालयामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून गटविकास अधिकारी पंचायत समिती कार्यालयात भेटत नसल्याने नागरिकांना काम न होताचघराकडे परतावे लागत आहे. तेव्हा नागरिकांचा खर्च वाया जात आहे.

शेतकरी आपला कामधंदा सोडून किनवटला काही कामानिमित्त पंचायत समिती कार्यालयामध्ये गटविकास अधिकाऱ्याकडे कामानिमित्त जात असत परंतु पंचायत समिती कार्यालयांमध्ये गटविकास अधिकारी भेटत नसल्याने शेतकऱ्यांसह नागरिक, सरपंच हैरान होत आहेत. आता विधानसभेची आचार संहिता संपली तरी गट विकास अधिकारी पंचायत समिती कार्यालयामध्ये भेटतच नाही. अशी चर्चा सध्या पंचायत समिती आवारामध्ये सुरू आहे. सध्या नागरिक, शेतकरी आपल्या घरकुलांच्या व विहिरीच्या फायली घेऊन पंचायत समितीमध्ये जात असतात. परंतु पंचायत समिती कार्यालयात गट विकास अधिकारी भेटत नसल्याने शेतकरी नागरिक चिंताग्रस्त होत आहेत. गट विकास अधिकारांच्या कार्यालयाकडे शेतकरी जातात पण तेथे साहेब दौऱ्यावर गेले असे उत्तर त्यांना मिळतील. त्यामुळे ते निराश होऊन घराकडे फिरतात एक तर कामधंदे सोडून किनवट ला जावे लागते तेथे ही साहेब भेटत नसल्याने शेतकरी नागरिक चिंताग्रस्त होत आहेत. तेव्हा संबंधित विभागाने गट विकास अधिकारी यांना पूर्ण वेळ कार्यालयात थांबण्याची तंबी देण्यात यावी. अशी मागणी नागरिक व शेतकरी करीत आहेत.

# साखर कारखाना कामगारांचा संपाचा इशारा !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, मुंबई :** वेतनवाढ व अन्य मागण्यांसाठी येत्या १६ डिसेंबरपासून बेमुदत संपावर जाण्याच्या दीड लाख साखर कारखाना कामगारांच्या इशाऱ्यानंतर राज्य सरकारने गुरुवारी कामगार,कारखानदार आणि सरकार यांच्या संयुक्त समितीची घोषणा केली. या समितीला वेतनवाढीचा अहवाल देण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.



राज्यात सहकारी आणि खासगी असे सुमारे २०० साखर कारखाने असून सध्या गाळप हंगाम सुरू आहे. या साखर कारखान्यांमध्ये दीड लाख कामगार काम करीत असून महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघ, महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय साखर कामगार फेडरेशन (इंटक), महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ या तीन संघटना त्यांचे नेतृत्व करीत आहेत. या कामगाराच्या वेतन व अन्य मागण्यांसाठी सरकारकडून दर पाच वर्षांनी साखर कारखाना मालक प्रतिनिधी, साखर कारखाना कामगार प्रतिनिधी आणि सरकारचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेली त्रिपक्षीय समिती स्थापन करण्यात येते. सध्याच्या वेतन कराराची मुदत मार्च महिन्यात संपल्यानंतरही नवीन समिती स्थापन करण्याबाबत सरकारकडून चालढकल सुरू होती. त्यामुळे नाराज झालेल्या कामगारांनी येत्या १६ डिसेंबरपासून संपावर जाण्याची नोटीस सरकारला बजावली होती. राज्यात सध्या गळीत हंगाम सुरू असून कामगारांनी संप केला त हंगाम अडचणीत येईल या धास्तीने कारखानदारांनीही हा संप होऊ नये यासाठी सरकारने प्रयत्न करण्याची विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली होती. फडणवीस यांनी साखर कारखाना कामगारांचा संप रोखण्याची जबाबदारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपविल्यानंतर पवार यांनी सर्व सबंधितांची बैठक घेऊन संप न करण्याची विनंती कामगार संघटनांना केली.

**पी.आर.पाटील समितीचे अध्यक्ष**

राज्य साखर संघाचे अध्यक्ष पी. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखालील या समितीमध्ये साखर संघाचे व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ, उपाध्यक्ष प्रकाश सोळंक,जयप्रकाश साळुंखे दांडेगावकर, प्रकाश आवाडे, दिलीप देशमुख तसेच कामगार संघटनांच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला आहे. सरकारच्या या निर्णयानंतर संपाबाबत फेरविचार करण्याची ग्वाही कामगार संघटनांनी दिल्याची माहिती सहकार विभागातील अधिकाऱ्याने दिली.

# भारताच्या बुद्धिबळपटूने घडवला इतिहास ; डी गुकेश विश्वविजेता!

भारताचा बुद्धिबळपटू डी गुकेश विश्वविजेता ठरला आहे. दोम्माराजू गुकेश ने १८व्या वर्षी विश्वविजेता होण्याचा बहुमान पटकावला. १८वर्षीय गुकेशने जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेत जगज्जेता डिंग लिरेनचं आव्हान मोडून काढत इतिहास घडवला.



आतापर्यंतच्या १३ डावांपैकी ३२वर्षीय लिरेनने पहिला डाव जिंकला होता. त्यानंतर गुकेशने तिसरा डाव जिंकून बरोबरी साधली. त्यानंतर दोन्ही ग्रँडमास्टर्सनी सलग सात डाव बरोबरीत सोडवले होते. ११व्या डावात गुकेशने विजय मिळवून बरोबरीची कोंडी सोडवली. १२व्या डावात लिरेनने बाजी मारली. अखेरचा डाव कोण जिंकणार की हा मुकाबला टायब्रेकरमध्ये जाणार याकडे बुद्धिबळ चाहत्यांचं लक्ष होतं. गुकेशने दमदार खेळ करत विश्वविजेता होण्याचा मान पटकावला. सगळ्यात लहान वयाचा विश्वविजेता होण्याचा विक्रम आता गुकेशच्या नावावर नोंदला गेला आहे. लिरेनच्या हातून झालेल्या घोडचुकीनंतर गुकेश विश्वविजेता होणार असल्याचं स्पष्ट झालं आणि त्याच्या डोळ्यात विजयाश्रू तरळले. गुरूवार, १२ डिसेंबर रोजी सिंगापूर येथे झालेल्या जागतिक बुद्धिबळ चॅम्पियनशिप साम न्याच्या १४व्या निर्णायक सामन्यात डिंग लिरेनचा पराभव करून सर्वात गुकेश विश्वविजेता ठरला. गुकेश हा विश्वनाथन आनंदनंतर विश्वविजेता ठरणार दुसरा भारतीय ठरला. गुकेश आणि डिंग यांनी गुरुवारी सामन्याच्या अंतिम डावात प्रत्येकी ६.५ गुणांसह बरोबरी साधली. १४व्या डावात, ज्यात डिंग पांढऱ्या सोंगट्यासह खेळत होता, तो सामन्याच्या ५३व्या चालीत डिंगने चूक होईपर्यंत अनिर्णित दिशेने वाटचाल केली होती. गुकेशने खेळत राहत डिंगवर दबाव आणणं सुरू ठेवलं आणि यात गतवर्षीचा विश्वविजेता लिरेन फसला. लिरेन आणि गुकेश यांच्यातील अंतिम डावातील सामना ही ड्रॉ होण्याच्या मार्गावर होता पण डिंगच्या हातून मोठी घोडचूक घडली आणि त्याच्या हातातून सामना निसटला. डी गुकेश या ऐतिहासिक विजयानंतर म्हणाला, सामन्यात जेव्हा मला कळलं की लिरेनने घोडचूक केली आहे, तो माझ्या जीवनातील खूप आनंदाचा क्षण होता. आपल्या सर्वांनाच माहितीय की लिरेन उत्कृष्ट खेळाडू आहे. तो बुद्धिबळच्या इतिहासातील एक उत्कृष्ट खेळाडू राहिला आहे. त्याने या सामन्यादरम्यान किती दबाव झेलला आणि शेवटपर्यंत हार न मानता दाखवून दिलं की खरा चॅम्पियन कसा असतो. माझ्यासाठी तो खरा विश्वविजेता आहे. मी जो क्षण अनुभवतो आहे तो अनुभवण्याचं प्रत्येक बुद्धिबळपटूचं स्वप्न असतं आणि आज मी माझं स्वप्न जगतो आहे. सर्वात आधी देवाचे खूप आभार.

डी गुकेश त्याच्या सपोर्ट स्टाफचे आभार व्यक्त करताना पुढे म्हणाला, गायो (ग्रेजेगोर्ज जेवस्की) गेल्या दोन वर्षांपासून माझे ट्रेनर होते. पॅडी उपटन माझ्या टीमचा भाग नसले तरी जागतिक बुद्धिबळ स्पर्धेसाठी सराव करताना त्यांचा खूप मोठा पाठिंबा मिळाला. RadosBaw Wojtaszek इथे आहेत. पेंटाला हरिकृष्णही आहेत. व्हिन्सेंट कीमर, जॅन-क्रिझिस्टोफ डुडा आणि जॅन क्लिमकोव्स्की हे माझ्या टीममधील इतर मंडळी आहेत.

पॅडी उपटन हे मेंटल हेल्थ कोच आहेत. ते दक्षिण आफ्रिका संघाचे क्रिकेट प्रशिक्षक राहिले आहेत. याबरोबर ते आयपीएलमधील राजस्थान रॉयल्स संघाचे २०१५-२०१५ आणि २०१९-२०२० दरम्यान कोच होते. तर दिल्ली कॅपिटन्स संघाचे २०१६ मध्ये प्रशिक्षक होते.

## मेहकरच्या त्या सर्किट युवकाला पोलिसांनी केली अटक

**अक्षराजः वृत्तसंकलन**

**दि.१२, बुलडाणा :** अचानक उद्धभवलेल्या आणीबाणीच्या प्रसंगाची पोलिसांना माहिती देण्यासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या प्रणालीवर चुकीची माहिती देणाऱ्या मेहकर येथील 'सर्किट' युवकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याने मध्यरात्री मंदिरावर हल्ला झाल्याचा संदेश '११२' वर दिल्याने मेहकर पोलिसांची धावपळ झाली होती. प्रत्यक्षात तसे काही झाले नसल्याचे आढळून आल्यावर त्याने वाहने जाळून टाकण्याची धमकी दिली. यामुळे त्याच्या विरुद्ध बुधवारी गुन्हा दाखल करून मेहकर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. नागरिकांना अचानक उद्धवलेल्या गंभीर घटनांची माहिती तात्काळ , आणीबाणीच्या प्रसंगात नागरिकांना मदत मिळावी या उद्धेशाने राज्याच्या गृह विभागाने महाराष्ट्र आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली विकसित केली आहे. आपत्कालीन स्थितीत नागरिकांना एकाच 'टोल फ्री' (११२) क्रमांकावर पोलिसांची मदत मिळावी असा या प्रणाली चा उद्धेश आहे. मात्र मेहकर येथील हरीश सदानंद पुरी (वय २१, राहणार राम नगर, मेहकर, जिल्हा बुलडाणा)या माथेफिरू युवकाने भलताच फायदा घेतला. त्याने ११२ वर संपर्क करीत मेहकर येथील एका मंदिरावर हल्ला करण्यात आल्याची धाधांत खोटी माहिती दिली. या प्रणालीवर नियुक्त नाईक पोलीस रमेश गरड यांनी तात्काळ घटनास्थळ गाठून पाहिले असता तसे काहीच आढळून आले नाही. त्यामुळे त्यांनी पुरी याला फोन लावल्यावर त्याने फोन घेतला नाही. काही वेळाने त्याने पोलीस गरड यांना फोन करून 'तुम्ही सेवा दिली नाही, तुमची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करतो, उद्या माळी पेठमध्ये वाहने जाळतो' अशी धमकी दिली.

## सागवानाची तस्करी करणारा ऑटो पकडण्यात किनवट वन विभागाला यश

**अक्षराज : कैलास राठोड**



**दि.१२, किनवट (नांदेड) :** किनवट तालुक्यातील कोठारी ते गोकुंदा रोडवर गस्त करताना सागवानाची तस्करी करणारा ऑटो पकडण्यात किनवट वन विभागाला यश आहे. परंतु आरोपी नेहमीप्रमाणे अंधाराचा फायदा घेऊन फरार झाले आहेत. दिनांक ११ डिसेंबर रोजी १८:३० वाजेच्या दरम्यान कोठारी ते गोकुंदा रोडवर गस्त करत असताना विना नंबरचा संशयित ऑटो दिसल्यावरून पाठलाग करून थांबवून पकडण्याचा प्रयत्न केले असता. ऑटो व सागी मुद्देमाल सोडून अंधाराचा फायदा घेऊन आरोपी फरार झाले.


सदर घटनेचा आरोपी विरुद्ध ०९/२०२४ नुसार वन गुन्हा नोंद करून सागी नग-७०घ.मी-किंमत -१०१०७=००अंदाजे ऑटो किंमत ३०,०००=००असे ऐकून मुद्देमाल किंमत ४०,१०७=०० जप्त करण्यात आले.

ही कार्यवाही उपवनसंरक्षक केशव वाबळे नांदेड सहाय्यक वनसंरक्षक जी.डी. वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक किनवट पी. एल. राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली मा. वन परिमंडळ अधिकारी चिखली एम. एन.कतुलवार वन परिमंडळ अधिकारी वनरक्षक बालाजी झंपलवार आर.बी. दांडेगावकर लिपिक मनोज गंगलवाड तसेच वाहन चालक बालकृष्ण आवले, वनमजूर साहेबराव राठोड यांचा या कार्यवाहीत सहभागी होते.

# संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे ही काळाची गरज

नुकताच २६ नोव्हेंबरला संपूर्ण देशात संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. अमृत महोत्सवी संविधान दिना निमित्त संपूर्ण देशात संविधानाचा जागर करण्यात आला. ठिकठिकाणी विविध उपक्रमांद्वारे संविधानाचे महत्व अधोरेखित करणारे कार्यक्रम, उपक्रम राबवण्यात आले मात्र संविधान दिन हा फक्त एक दिवसाचा सोहळा ठरता कामा नये वास्तविक संपूर्ण वर्षभर संविधानाचा जागर व्हायला हवा.

दौंड मधील 'आम्ही भारताचे लोक' ही सामाजिक संघटना वर्षभर म्हणजे वर्षातील ३६५ दिवस संविधानाचा जागर करते. संविधानाच्या एका कलमा वर दररोज विस्तृत चर्चा केली जाते. संविधानाने दिलेले हक्क आणि अधिकार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे काम ही संघटना करते. या संघटनेच्या या कार्याचे खरोखरच कौतुक व्हायला हवे. आम्ही भारताचे लोक संघटनांसारख्या वर्षभर संविधानाचा जागर करणाऱ्या संघटना अतिशय कमी आहेत म्हणूनच नागरिकांमध्ये संविधानाबाबत अद्यापही म्हणावी तशी जागृती होऊ शकली नाही. संविधान लागू होऊन आज ७५ वर्ष उलटली तरी नागरिकांना आपले हक्क आणि अधिकार माहीत नाहीत म्हणूनच संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची वेळ आली आहे. संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करावा ही खूप जुनी मागणी आहे मात्र त्याला अद्यापही म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. नाही म्हणायला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या पदवीचे शिक्षण घेणाऱ्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना दोन श्रेयांकाचा,( क्रेडिट कोर्स) शिकवला जात




आहे मात्र हा कोर्स घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या त्यामानाने खूप कमी आहे म्हणूनच संविधान हा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा. आज आपल्या देशात लाखो विद्यार्थी पदवीधर होतात पण आपल्या संविधानाचा अभ्यास अतिशय कमी विद्यार्थ्यांना असतो. उच्च शिक्षित असूनही संविधानाची जुजबी माहितीही विद्यार्थ्यांना नसते. शालेय अभ्यासक्रमात नागरिकशास्त्र हा विषय शिकवला जातो तो पण त्रोटक स्वरूपात शिकवला जातो त्यात संविधानाची माहिती नसते. स्थानिक स्वराज्य संस्था, त्यांचे कार्य – अधिकार, निवडणूक, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद, लोक्रतिनिधींनिंची जबाबदारी, अधिकार अशा स्वरूपाचीच माहिती नागरिक शास्त्रात पाहायला मिळते त्यामुळे संविधानाबाबत उच्च शिक्षित विद्यार्थी अज्ञानीच असतात. त्यांचे हे अज्ञान दूर होण्यासाठी संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे गरजेचे आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत हक्क, कर्तव्य, अधिकार यांचा समावेश आहेच पण देशाचा आदर्श कारभार कसा करावा याचेही नियम आहेत. समता, बंधुता यांचीही शिकवण संविधानात आहे. संविधानामुळेच देश अखंड आहे. संविधान हा लोकशाहीचा पाया आहे. संविधान हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. संविधान आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे. भारताचे संविधान शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले तर राज्याच्या आणि राष्ट्राच्या उभारणीत ते योग्य दिशेने आपापल्या क्षेत्रात कार्य करू शकतील म्हणूनच हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट होणे ही काळाची गरज आहे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# शेतकरी संघर्ष समितीची गांधीगिरी ; केळी, गाजर वाटप आंदोलन

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१२, धाराशिव :** तुळजापूर तालुक्यातील शेतकर्यांच्या विविध मागण्यासंदर्भात शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने गुरुवार, दि. १२ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता राष्ट्रीय महामार्ग ६५ वर नळदुर्ग बसस्थानकाशेजारी गांधीगिरी पद्धतीने केळी व गाजरे वाटप आंदोलन करून मागण्यांकडे लक्ष वेधले. शेतकरी संघर्ष समितीचे समन्वयक दिलीप जोशी, जिल्हाध्यक्ष सरदारसिंग ठाकूर, तुळजापूर तालुकाध्यक्ष व्यंकट पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

सध्या साखर कारखान्यांच्या गळीत हंगाम सुरु आहे. परंतु शासनाने उसाचा दर निश्चित केलेला नसताना शेतकर्यांचा ऊस गाळपासाठी कारखाने नेत आहेत. ऊस उत्पादनासाठी येणारा खर्च लक्षात घेता शासनाने किमान ३७०० रुपये प्रतिटन दर भाव घोषित करून सर्व कारखानदारांना आदेशित करण्यात यावे. धाराशिव जिल्ह्यामध्ये सोयाबीन खरेदी उशिरा सुरू केल्यामुळे शेतकर्यांनी खाजगी व्यापाऱ्यांना अतिशय कमी भावात विक्री केली. सोयाबीन मधील आर्द्रता शासनाच्या नियमाप्रमाणे १२% किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक असताना जाचक अटीमुळे शेतकर्यांचे सोयाबीन खरेदी केंद्रावर नाकारले गेले. त्यानंतर केंद्रीय शेतकरी कल्याण मंडळांनी आर्द्रतेचे प्रमाण १५% पर्यंत ग्राह्य धरावे असे परिपत्रक काढले. मात्र कोणत्याही खरेदी केंद्राने परिपत्रकाचे पालन केलेले नाही.



तुळजापूर तालुक्यातील नऊ महसूल मंडळामध्ये दुष्काळसदृश स्थितीची घोषणा करण्यात आली व शासनाने सवलती लागू केल्या. त्याच्या उपाययोजना व अंमलबजावणी काय करण्यात आली याची माहिती लेखी स्वरूपात शेतकरी संघर्ष समितीला मिळाली. यासाठी पाठपुरावा केला. तुळजापूर तहसीलदार यांनी सर्वसंबंधित खात्यांना माहिती उपलब्ध करून देण्यात यावी असे पत्र दिले. तरीसुद्धा माहिती उपलब्ध झाली नाही. तहसीलदारांनी कोणतेही कार्यालय प्रतिसाद देत नसल्याबाबत जिल्हाधिकार्यांना पत्र दिले. तरीही प्रतिसाद न देणार्या सर्व कार्यालय प्रमुख व संबंधित कर्मचारी यांची कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी विभागीय आयुक्त यांच्यामार्फत खातेनिहाय चौकशी करण्यात यावी अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीने केली आहे.

तुळजापूर तालुक्यात अतिवृष्टी झालेली असताना शासनाची कोणतीही सवलत किंवा भरपाई मिळालेली नाही. तरी तुळजापूर तालुक्याचा दुष्काळ व अतिवृष्टी यादीत समावेश करून सर्व शेतकरी व विद्यार्थी यांच्यावरील अन्याय दूर करावा. पीकविमा २५ टक्के अग्रीम रक्कम वंचित शेतकऱ्यांना तात्काळ वितरित करण्यात यावी व उर्वरित ७५ टक्के विमा केंद्र सरकारने २६ एप्रिल २०२४ चे जाचक परिपत्रक रद्द करून लाभार्थी शेतकर्यांना द्यावा. तसेच उपाधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय तुळजापूर येथे कायम स्वरूपी उपाधीक्षक यांची नेमणूक करून शेतकऱ्यांची गैरसोय दूर करावी, अशी मागणीही समितीने केली.

आंदोलनात शेतकरी बचाव संघर्ष समिती समन्वयक दिलीप जोशी, जिल्हाध्यक्ष सरदारसिंग ठाकुर, महादेव बिरादार, महेश घोडके, पंडित पाटील, व्यंकट पाटील, पीरपाशा इनामदार, अजमोद्दीन शेख, बालाजी ठाकुर, प्रताप ठाकुर, बाबासिंग राजपुत, दिलीप पाटील, काशिनाथ काळे, सुनिल डुकरे, अमजत शेख, कालिदास जाधव, शंकर कांबळे, स्वामिनाथ माडगे, गुलाब शिंदे, शिवरत्न कांबळे, राजरत्न कांबळे, हकीम कुरेशी व इतर शेतकरी सहभागी झाले होते. मंडळ अधिकारी पी.एस. भोकरे यांनी निवेदन स्विकारले. आंदोलनादरम्यान अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस बी. ए. वाघमारे, गायकवाड, एस. एल. जटे , खलील शेख यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## संपादकीय



### वाढदिवस दक्षिणेतील देवाचा

दक्षिणेतील देव अशी ओळख असलेले सुपरस्टार रजनीकांत यांचा आज ७४ वा वाढदिवस. सुपरस्टार रजनीकांत यांच्या शिरपेचात तीन वर्षांपूर्वी एक मानाचा तुरा रोवला गेला होता. रजनीकांत यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च अशा मानाच्या दादासाहेब फाळके पुरस्काराने दोन वर्षापूर्वी गौरविण्यात आले होते. ६७ व्या राष्ट्रीय फिल्म पुरस्कार सोहळ्यात तत्कालीन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू आणि केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्या हस्ते त्यांना या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले होते. रजनीकांत यांना यापूर्वी पद्मभूषण (२०००) व विद्मविभूषण (२०१६) या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. जिवंतपणीच आख्यायिका बनलेले रजनीकांत हे एक अवलिया व्यक्तिमत्त्व. रजनीकांत यांच्या नावावर अनेक विनोद, टोमणे, उपदेश, म्हणी, मिम्स प्रचलित आहेत. रजनीकांत यांचे देश विदेशात हजारो फॅन क्लब्ज आहेत. रजनीकांत यांना उद्देशून एखादा अपशब्द जरी काढला तरी तामिळनाडूत दंगली उसळतात. त्यांच्या इतकी लोकप्रियता कोणत्याच अभिनेत्याला मिळालेली नाही. त्यांचा चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच सुपरहिट झालेला असतो. त्यांच्या चित्रपटाचे तिकीट काढण्यासाठी प्रेक्षक पहाटेपासूनच रांगा लावतात. त्यांच्या फोटोवर दुग्धाभिषेख करतात. तामिळनाडूत तर त्यांची मंदिरे आहेत. देवाप्रमाणे लोक त्यांची पूजा करतात. १२ डिसेंबर १९५० रोजी बंगळुरू येथे एका महाराष्ट्रीयन कुटुंबात रजनीकांत यांचा जन्म झाला. त्यांचे खरे नाव शिवाजीराव गायकवाड असून त्यांच्या वडिलांचे नाव रामोजीराव गायकवाड असे असून आईचे नाव जिजाबाई असे आहे. पुरंदर तालुक्यातील मावडी- कडेपठार हे त्यांचे मूळ गाव. ८० - ९० वर्षांपूर्वी त्यांचे कुटुंब बंगळुरात स्थलांतरित झाले व तिथेच स्थायिक झाले. त्यांचे वडील कर्नाटक पोलिसात शिपाई होते. रजनीकांत यांना लहानपणापासून अभिनयाचे वेड होते. अभिनयाचे वेड जपत त्यांनी अनेक लहानसहान कामे केली. बारावी पास झाल्यावर काही काळ त्यांनी बस कंडक्टर म्हणूनही काम केले. नशिब आजमावण्यासाठी त्यांनी मद्रास फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला आणि सिनेजगताला एक सुपरस्टार मिळाला. अपूर्ण रागंगल या तामिळ चित्रपटातुन त्यांनी आपल्या फिल्मी करियरची सुरवात केली. आजवर त्यांनी १५० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या. अंधा कानून या चित्रपटातून त्यांनी बॉलिवूड मध्ये पदार्पण केले. केवळ तामिळ आणि हिंदीच नव्हे तर कन्नड, तेलगू, तामिळ, बंगाली, इंग्रजी चित्रपटातून भूमिका केल्या. चार दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे रजनीकांत हे आपल्या अभिनयाबरोबरच आपल्या डॅशिंग स्टाईल आणि स्टंट साठीही ओळखले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वजण त्यांचे चाहते आहेत. दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीचे अनभिषिक्त सम्राट, प्रेक्षकांची गर्दी खेचून आणणारे, आपल्या संवाद फेकी बद्दल प्रसिद्ध आणि विशिष्ट स्टाईल बद्दल प्रसिद्ध आणि आपल्या विशिष्ट अभिनय शैली साठी रजनीकांत ओळखले जातात. दक्षिण भारतात त्यांच्या नावे सर्वात जास्त यशस्वी चित्रपट आहेत. त्यांचा चाहतावर्ग देशातच नाही तर विदेशातही आहे. जपानमध्ये त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. तिथे त्यांचे चित्रपट अधिक लोकप्रिय आहेत. तिथेही त्यांचे फॅन क्लब्ज आहेत. सर्वाधिक चाहतावर्ग असलेला अभिनेता म्हणून त्यांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये त्यांची नोंद झाली आहे. त्यांना चार वेळा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कारही मिळाला आहे. रजनीकांत जितके अभिनेते म्हणून श्रेष्ठ आहेत तितकेच ते माणूस म्हणूनही श्रेष्ठ आहेत. ते त्यांना मिळणाऱ्या मानधनाच्या एकूण ४० टक्के एव्हढी रक्कम समाजसेवेसाठी वापरतात. रजनीकांत हे असे एकमेव अभिनेते आहेत की जे एकाही उत्पादनाची जाहिरात करत नाहीत. उद्देश एकच की लोकांमध्ये कोणताही चुकीचा संदेश जाऊ नये.

जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या या सुपरस्टारला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

### पवार साहेब...

पदत्यागाचा निर्णय
काळजाघातले घण
युध्द चाले मनामना
अचानक पेटले रण

उत्साहाला नसे वय
हरवले म्हातारपण
लाजवालं तरुणाही
पवारसाहेब आपण

कोणकसे करूशके
पावसामध्ये भाषण
नवनवीन फंडे झेंडे
केले आपण रोषण

जन सेवा ईश सेवा
सकस बीजारोपण
आतुरले विरोधकही
करी नित्य संभाषण

सल्ला घेई वेळोवेळ
विरून जाते घर्षण
धुरंधर अनुभव तव
सर्वां असे आकर्षण

बोट धरुन शिकवले
भल्यांना राजकारण
बाकी सारे हार मानी
आपले विजयीतोरण


विसरणे कठीण असे
आयुष्य सारे समर्पण
मातीशी नाते जोडले
कधीही नाही मी पण

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# वाद्य संशोधक लंकापती रावण : रावणास्त्रम !

पंडित समता प्रसाद या त्रिकुटाने व्हायोलिन-सनई-तबला या वाद्यांच्या जुगलबंदीने अफाट लोकप्रियता मिळवली होती. व्हायोलिनचा जो एक मोकळा, दमदार, घुमदार आवाज आहे, तो त्याच्या लाकडी बॉडीमुळे. त्या बॉडीलाच ध्वनिपेटिका असे म्हणतात. हे लाकूड विशिष्ट प्रकारचे असते. आपल्याकडे जसे तंबोऱ्याचे भोपळे पंढरपूर, मिरज या भागातच होतात, तसे व्हायोलिनचे लाकूड युरोपातील विशिष्ट प्रदेशात उपलब्ध होते. म्हणूनच इटालियन व जर्मन बनावटीची व्हायोलिने जगात सर्वोत्तम मानली जातात. या विशिष्ट लाकडापासून बनविलेली व्हायोलिनची ध्वनिपेटिका, त्याचा विशिष्ट आकार, धातूच्या तारा यामुळे व्हायोलिनला विशिष्ट आवाज प्राप्त झाला आहे. तरफांच्या जादा तारा लावताना व्हायोलिनच्या ध्वनिपेटिकेला कडेने खुंट्यांची सोय केली जाते. त्या वेळेस ध्वनिपेटिकेचे लाकूड दाबले जाते व त्यातून बद्ध व दबलेला आवाज येतो.

हे वाद्य जितके मधुर वाजते, तितकेच सुंदर दिसते. याचा नाजूक, आकर्षक, कमनीय आकार व बदामी तुळतुळीत रंग प्रथम दर्शनीच लक्ष वेधून घेतो. केवळ चार तारा सुरांत लावल्या की, मनात योजाल ते संगीत साकार करता येते. या वाद्याला कोठी (बॉडी), त्याला लागून असलेली लांब दांडी आणि गज असे तीन भाग आहेत. कोठीला चार तारा असतात. धातूच्या या तारांची लांबी सारखी असली तरी जाडी कमी-जास्त असते. जाडीवर तारेच्या स्वरांची उंची अवलंबून असते. तारेची लांबी व तिची कोठ्यापासूनची उंची यांचे प्रमाण व्यस्त असते. तार जितकी लांब तितका स्वर ढाला, खर्जातला असतो. तार जितकी आखूड तितका स्वर उंच असतो. लांबीला समान असणाऱ्या व्हायोलिनच्या तारांचा स्वर त्यांच्या जाडीवर अवलंबून असतो. एका सिद्धांतानुसार भारतीय वाद्याचे मूळ नाव व्हायोलिन- बेला होते. हा दृष्टिकोन ठेवणार्यांच्या मते, लंकापती रावणाने एका वाद्याचा शोध लावला जो गळक्याने वाजवला जाऊ शकतो. त्याचे नाव होते रावणास्त्रम. यानंतर हे वाद्य स्पेनमधून पारशिया, अरबस्तान मार्गे भारतापर्यंत आणि ११व्या शतकाच्या शेवटी जगभर गेले. तेथे आज आपल्याला माहित असलेल्या व्हायोलिनमध्ये त्याचे संपूर्ण रूपांतर झाले. एका पाश्चात्य अभ्यासकाने असा दावा केला आहे की व्हॉइल म्हणून ओळखले जाणारे एक वाद्य ४०० वर्षांपूर्वी युरोपमध्ये तयार केले गेले आणि सोळाव्या शतकाच्या अखेरपर्यंत ते तेथे लोकप्रिय झाले. या व्हॉइल उपकरणाची रचना नंतर व्हायोलिन तयार करण्यासाठी वापरली गेली. दुसर्या दाव्यात असे म्हटले आहे की व्हेनिस येथील लिनारोनी या गावकऱ्याने १५६३ मध्ये टॅनर व्हायोलिन तयार केले. दोन इटालियन कलाकारांनी त्यास नवीन स्वरूप देण्यासाठी अतिरिक्त वैशिष्ट्ये जोडून मूळच्या आधारावर सुधारित केले. काही जण असा दावा करतात की हा जर्मन शोध होता. अशा प्रकारे व्हायोलिनबद्दल अनेक मते आहेत. काहीही असले तरी, एखाद्याने फक्त हे स्वीकारले पाहिजे की हे वाद्य त्याच्या समकालीन स्वरूपात विचित्र आहे. भारतात विशेषतः दक्षिण भारतात त्याचा अधिकाधिक प्रचार केला जात आहे. चांगले व्हायोलिन वादक आता या भागात मोठ्या प्रमाणावर आहेत.



इंस्ट्रुमेंटल अवयव- व्हायोलिन-बेलामध्ये सहा प्राथमिक अवयव असतात, ध्वनी म्हणजे शरीर. याला बेली असेही म्हणतात. व्हायोलिनचे शरीर म्हणून त्याचा विचार केला तर, आतील खांबामुळे फिंगर- फिंगर बोर्ड-बोटांच्या टोकांचा वापर करून आवाज पुनर्प्राप्त केले जातात. शेपटीचा तुकडा- ज्याला चार छिद्रे आहेत, हा एक घटक आहे. या चार छिद्रांतून चार तारा खुट्यांना जोडतात. एंड पिन- त्यात टेलपीस घातला आहे. ब्रिज- त्याच्या शिखरावरून तारा खुटींकडे धावतात. ध्वनी पोस्ट- हा घटक पुलाच्या खाली व्हायोलिनच्या आत स्थित आहे. इंस्ट्रुमेंटल व्हायोलिन पद्धत: व्हायोलिनच्या चार तारा आणि त्यांचे मिश्रण करण्याचे तंत्र- व्हायोलिनमध्ये एकूण चार तारा असतात, ज्यांना इंग्रजीत जी, डी, ए आणि ई (जीडीएई.) असे संबोधले जाते. मिश्रणाचे विविध प्रकार आहेत- पहिला प्रकार की, हे घटक एकत्र मिसळले जातात. उदाहरणार्थ- मंद्राचा पंचम, अष्टकाचा पंचम, पंचम आणि अष्टकांचा तार आणि सप्तक. दुसऱ्या श्रेणीतील स्टिल अशा प्रकारे एकत्र केले जातात. दुसऱ्या शब्दांत, सुरुवातीच्या दोन तारा मंद्राच्या पाचव्या- नोट षड्यंत्रात आहेत, तर शेवटच्या दोन तारा मध्य अष्टकच्या पाचव्या- नोट केंद्रात आहेत. तो अशा प्रकारे तिसरा प्रकार मिश्रित करतो. भारतात या तिसर्या श्रेणीचा सर्वाधिक प्रसार आहे.

**!! जागतिक व्हायोलिन दिनानिमित्त सर्व वाद्य व संगीत प्रेमींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!**

**– संकलन व सुलेखन –**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पालशेत कलानिकेतन झिंबरवाडीत बांधण्यात आले सार्वजनिक स्वछतागृह



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१२, गुहागर :** गुहागर तालुक्यातील पालशेत येथील सामाजिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असणारी कलानिकेतन झिंबरवाडी संस्था, गेली अनेक विविध सामाजिक उपक्रम राबवत असून वाडीमध्ये विविध सोयी, सुविधा उपलब्ध होण्यासाठी संस्था कायम प्रयत्नशील असते. नुकताच वाडीमध्ये सार्वजनिक स्वछतागृह बांधणे, तत्पूर्वी वाडीतील सभागृहांच्या सार्वजनिक ठिकाणी स्वछतागृह असावे अशी वाडीतील महिला मंडळ, तरुणवर्ग आणि ग्रामस्थांनी वाडीचे अध्यक्ष मुरलीधर डाकवे ह्यांच्याकडे इच्छा व्यक्त केली होती. अध्यक्ष डाकवे यांनी तात्काळ दखल घेत सहयोग फाऊंडेशन पालशेत ह्यांच्या मार्फत आपण सार्वजनिक स्वछतागृह बांधण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे जाहीर केले. त्यानुसार सहयोग फाऊंडेशन संस्थेला प्रथम प्राधान्य दिले. कारण स्वच्छ गाव, स्वच्छ भारत या उपक्रमात सहभागी होत सहयोग फाउंडेशन संस्थेने स्वछता मोहीम राबिवली होती. म्हणून उपरोक्त संस्थेला प्रथम प्राधान्य दिले असल्याचे डाकवे यांनी सांगितले. आमच्या विनंतीला मान देऊन काही महिन्यांतच सहयोग फाऊंडेशन (पालशेत) संस्थेने महिला आणि पुरुषांसाठी स्वछतागृह बांधून दिले. सदर स्वछतागृहाचे उद्घाटन झिंबरवाडीतील महिला पदाधिकारी ह्यांच्या हस्ते करण्यात आले. मुरलीधर डाकवे ह्यांनी सोहळ्याचे सूत्रसंचालन करत सहयोग फाऊंडेशनचे आभार मानले. कार्यक्रमाप्रसंगी कलानिकेतन झिंबरवाडीतील महिला मंडळ, तरुणवर्ग आणि ग्रामस्थ, त्याचबरोबर सहयोग फाऊंडेशनचे पदाधिकारी, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाबळेश्वर अर्बन बँकेची सभा खेळीमेळीत संपन्न




**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१२, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर तालुक्याची अर्थवाहिनी असलेल्या महाबळेश्वर अर्बन बँकेची ८९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.८/१२/२०२४ रोजी बँकेचे चेअरमन समीर सुतार यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या वेळी चेअरमन यांनी थकबाकी कमी करण्यासाठी सभासदांनी सहकार्य करावे त्याच प्रमाणे थकबाकीदार सभासदांनी थकीत कर्ज वेळेत भरणा करून लिलाव व जमी वसुली सारख्या कटु कारवाईस सामोरे जावे लागणार नाही याची काळजी घ्यावी. बँकेचे भाग भांडवल वाढी करिता सहकार्य करावे व सर्व व्यवहार बँके मार्फत करावेत असे आवाहन केले. सभेचे सुत्रसंचलन मुख्यव्यवस्थापक फकिर वलगे यांनी केले. संचालक चंद्रकांत बावळेकर यांनी स्वागत केले. दिवंगतांना श्रद्धांजली प्रशांत कात्रट यांनी अर्पण केली, अहवाल वाचन माजी चेअरमन दत्तात्रय वाडकर यांनी केले अभार प्रदर्शन माजी व्हा चेअरमन जावेद वलगे यांनी केले सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांचे शंका निरसन चेअरमन समीर सुतार संचालक राजेश कुंभारदरे, मुख्यव्यवस्थापक फकिर वलगे आदींनी केले सदर सभेस व्हा चेअरमन शरद बावळेकर संचालक सतीश ओंबळे, नदीम शारवान, संपत जाधव, मनिषा पारठे, उषा ओंबळे, अनिल सांळुखे, तज्ञ संचालक मिलिंद ढेबे, माजी संचालक युसूफ शेख, अशोक फळणे, गोपाळ लालबेग किशोर कोमटी ,तुकाराम बावळेकर व सभासद अॅड. संजय जंगम, विजय नायडू, रविंद्र कुंभारदरे, महेश कोमटी, आबा शिंदे, नसिम पन्हाळकर, कासमभाई नालबंद राजेंद्र पवार, रमेश शिंदे, पत्रकार बांधव इत्यादी मान्यवर सभासद उपस्थित होते.

सभासद समुह अपघात विमा योजनेमधून तीन लाख रु.चा धनादेश मुन्नवर नालबंद यांच्या कुंटुबीयांना प्रदान करण्यात आला. बँकेने ग्राहकांसाठी आरटीजीएस, एनइफटी तसेच एटीएम सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. भविष्यात कॅश डिपॉझिट मशिन, बँकेचे मोबाइल अॅप, जेष्ठ सभासदांना विरंगुळा केंद्र, सभासद महिलांकरिता मोफत कायदेविषयक सल्ला केंद्र बँकेमार्फत सुरू करण्यात येणार आहे

## राज्यपालांच्या उपस्थितीत गीता जयंती महोत्सव साजरा




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, मुंबई :** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील कांदिवली येथे बुधवारी सायंकाळी गीता जयंती महोत्सव साजरा झाला. 'भगवद्गीता' एक कालातीत मार्गदर्शक ग्रंथ असून आजही अत्यंत समर्पक आहे. भगवद्गीता आपल्याला जगणे शिकविते, असे प्रतिपादन राज्यपाल श्री.राधाकृष्णन यांनी केले.

पोईसर जिमखाना आणि इस्कॉन जुहू यांच्यामार्फत या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार आशिष शेलार, आमदार मनीषा चौधरी, आमदार संजय उपाध्याय, माजी खासदार गोपाळ शेट्टी, भगवद्गीता शिक्षा अभियान समितीचे अध्यक्ष डॉ. योगेश दुबे, जुहू इस्कॉनचे अध्यक्ष श्री. ब्रज हरी दास, पोईसर जिमखानाचे अध्यक्ष मुकेश भंडारी, अमेरिकेच्या टेक्सासचे अटॉर्नी जनरल केन टॅक्सन आदी यावेळी उपस्थित होते.

# गुहागर तालुक्यात गोमाता तस्करीचा प्रयत्न; भाजपा आक्रमक

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१२, गुहागर :** गुहागर तालुक्यातील पोमेंडी गावामध्ये बुधवार दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजी मध्यरात्री गाईंच्या तस्करीचा प्रयत्न झाल्याची घटना समोर आली आहे.




गुहागर तालुक्यातील पोमेंडी गावामध्ये रायगड मधील जावेद नावाचा दलाल चिपळूण तालुक्यातील मार्गताम्हाने मधील पालशेतकर आडनावाचा दलाल आणि त्याचबरोबर गुहागर तालुक्यातील पोमेंडी गावातील काही स्थानिक आरोपी हे एकत्रित या गाईंची तस्करी करण्याचा प्रयत्न करत असल्याचे विश्व हिंदू परिषदेचे प्रखंड मंत्री, पोमेंडी येथील स्थानिक रहिवासी श्रीराम विचारे यांच्या लक्षात आले. ही तस्करी रोखण्याचा श्रीराम विचारे आणि त्यांच्या सहका-यानी प्रयत्न केला. यावेळी या तस्करांकडून विचारे यांना पैशाच्या स्वरूपात लाच देण्याचाही प्रयत्न करण्यात आला, मात्र विचारे दाद देत नसल्याचे लक्षात आल्यानंतर या तस्करांनी येथून पलायन करण्याचा प्रयत्न केला. यावेळी विचार यांनी पोलीस हेल्पलाइन नंबरला कॉल करून ही गाडी आणि त्यामधील तस्कर यांना पकडण्यात अखेर पोलिसांना यश आले.

यानंतर या सर्वांना गुहागर पोलिस स्थानकात आणण्यात आले. या धावपळीमध्ये या गाडीतील एका गाईचं मृत्यू झाला. मृत्यू झालेल्या गाईला संबंधितांकडून पोलिसांच्या सूचनेनुसार दफन करण्यात आले. देशांमध्ये गोमातेच्या तस्करीची आणि गोहत्तेची अनेक प्रकरणे समोर येत असताना गुहागर तालुक्यासारख्या ग्रामीण भागात सुद्धा हे पेव पोहचलेले असल्याचे ह्या घटनेतून भयानक सत्य यावेळी समोर आले आहे.

**अवैध वाहतूक करणाऱ्या नराधमांवरती कठोर कारवाईची गुहागर तालुका भारतीय जनता पार्टीची मागणी.**

अशी हिम्मत पुन्हा कोणी करू नये, गोमातेच्या तस्करीला आळा बसावा याकरता भारतीय जनता पार्टीच्यावतीने तालुकाध्यक्ष निलेश सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १२ डिसेंबर २०२४ रोजी गुहागर पोलीस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले असून या निवेदनाद्वारे अटक केलेल्या या गोमातेच्या तस्करांना जास्तीत जास्त कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# निवासी परिसरात पुन्हा प्रदूषण वाढले...

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१२, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली एमआयडीसी निवासी आणि आजूबाजूच्या परिसरात गेल्या काही महिन्यात रासायनिक प्रदूषण वाढल्याचा तक्रारी नागरिकांकडून म ोठ्या प्रमाणात येत असल्याचे दिसत आहे. आठवड्यातील दोन ते तीन दिवस रासायनिक गॅस हा रात्री, पहाटे, सकाळी निवासी आणि आजूबाजूच्या परिसरात, गावांत सोडण्यात येत आहे.



मात्र विशेष विधानसभा निवडणुक आचारसंहितेचा काळात या प्रदूषणाचे प्रमाण कमी झाले होते. वाढत्या प्रदूषणाबाबत येथील काही ज्येष्ठ, तरुण नागरिक सुरेखा जोशी, वसंत शिंदे, महेश नाईक इत्यादीजण आपल्या तक्रारी प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण कार्यालयातील उपप्रादेशिक अधिकारी श्री उपेंद्र कुलकर्णी व इतर अधिकाऱ्यांकडे फोन/मेसेज द्वारे करीत असतात. तक्रारी नंतर काही अधिकारी तपासणी साठी येतात तेव्हा सदर हा विषारी गॅस गायब झालेला असतो. काही वेळा प्रदूषण संदर्भात तक्रारी नंतर प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगांच्या कामा या संघटनेतील एका ठराविक पदाधिकाऱ्याला पाठवून त्यांच्याकडून चौकशी, तपासणी केली जात असल्याचे दिसते. त्यामुळे येथील नागरिकांमध्ये प्रदूषण नियंत्रण मंडळाबाबत विश्वासार्हता राहिली नाही आहे. आता नागरिकांनीही याची अंतर्मनात तयारी केली असून काही जण येथील आपली घरे विकून किंवा भाड्याने देवून येथून सोडून जावू लागले आहेत. डोंबिवली एमआयडीसी कार्यालयात याबद्दल विचारले तर ते प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी करा असा सल्ला देतात. जर यापुढेही असेच रासायनिक प्रदूषण होत राहिले तर येथील नागरिक मोठ्या आंदोलनाच्या पावित्र्यात असून एमपीसीबी, एम आयडीसी कार्यालयावर धडक मारून त्याच्या जाब विचारणार आहेत.

येथून नव्याने निवडून आलेले स्थानिक आमदार राजेश मोरे आणि खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी हा जुना प्रदूषणाचा ज्वलंत प्रश्न सोडवावा तसेच येथील धोकादायक कंपन्या स्थलांतरण संदर्भात योग्य तो निर्णय घ्यावा अशी जनतेर्फे विनंती करण्यात येत आहे.

# दिव्यातील अनधिकृत शाळा बंद कराव्यात मेस्टा संघटनेची मागणी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१२, दिवा (ठाणे) :** दिव्यातील अनधिकृत शाळेमध्ये मुलीच्या छेड छाडीचा निंदनीय प्रकाराबाबत चौकशी करून त्या शाळेवर कारवाई व्हावी तसेच दिवा भागातील अनधिकृत शाळा बंद कराव्यात, अशी मागणी मेस्टा संघटनेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष नरेश पवार यांनी काल पत्रकार परिषदेत केली.




दिवा येथील एका अनधिकृत शाळेत निंदनीय असा प्रकार घडलेला आहे. अशा अनधिकृत शाळांवर कारवाई करण्यासाठी मेस्टा संघटनेतर्फे तीन वर्षे प्रयत्न सुरू आहेत. या संदर्भात ठाणे महानगरपालिका शिक्षण विभाग, जिल्हा परिषद ठाणे - प्राथमिक विभाग, जिल्हा परिषद ठाणे म ाध्यमिक विभाग, शिक्षण उपायुक्त, चर्नी रोड, मुंबई, तसेच विभागीय आयुक्त शिक्षण विभाग पुणे या विविध ठिकाणी संघटनेच्या माध्यमातून दिवा येथे सुरु असलेल्या अनधिकृत शाळांची माहिती शासन दरबारी पोहचवीत आहेत. पण या अनधिकृत शाळा बंद होण्या ऐवजी त्यांची संख्या ४० वरून ७० च्या वर गेली आहे.

या अनधिकृत शाळांना कोणत्याही प्रकारचे गुणपत्रिका, शाळेचा दाखला, बोनाफाईड सर्टिफिकेट, लेटर हेड व स्टॅंप हे बनवायचे कोणतेही अधिकार नसतांना विद्यार्थ्यांची व पालकांची फसवणूक सुरु असून अनधिकृत शाळांमध्ये सर्रासपणे विद्यार्थ्यांना खोटे कागदपत्रे दिले जात असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

शिक्षणाधिकारी ठाणे महानगरपालिका, ठाणे, जिल्हा परिषद शिक्षण विभाग, ठाणे यांच्या कार्यालयात सातत्याने भेट देऊनही त्यांच्या द्वारे कोणतीही कार्यवाही अनधिकृत शाळांवर करण्यात आली नाही, असेही यावेळी सांगून प्रशासनाशी वारंवार पत्रव्यवहार करून सुद्धा कोणत्याही प्रकारची कारवाई अनधिकृत शाळांवर होत नाही, याचा अर्थ काय समजावा? असा सवाल पत्रकार परिषदेत मेस्टा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला आहे.

काही शाळांनी तर खोटे शाळा मान्यतेचे पत्रही बनविलेले आहेत. त्याचे पुरावे संघटनेकडे उपलब्ध आहेत. पुरावे शिक्षणअधिकारी व विभागीय आयुक्त शिक्षण विभाग यांच्याकडे सुपूर्द केलेले आहेत.

ज्यावेळी बदलापूर येथील शाळेमध्ये जी घटना घडली त्यानंतर राज्यातील सर्व शाळेमध्ये विविध समित्या गठीत करण्यात आल्या. तसेच अनेक विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेबाबत अनेक बाबींचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी संघटनेने मार्फत मा. शिक्षण अधिकारी, मा.आमदार तसेच मा. विभागीय आयुक्त शिक्षण विभाग यांना विचारणा करण्यात आली की जर बदलापूर सारखी घटना एखाद्या अनधिकृत शाळेत घडली तर त्याला जबाबदार कोण? शासनाद्वारे सखी सावित्री समिती, विशाखा समिती, विद्यार्थी सुरक्षा समिती, या समित्या बनवण्यात आल्या आहेत. त्यापैकी एकही समि ती अनधिकृत शाळेत बनवलेली आहे का? साधी पालक शिक्षक संघ ही समिती आहे का?याबद्दल ही शंका आहे.

असा गैरसमज केला जातो की अनाधिकृत शाळेमध्ये फी कमी आहे. परंतु दिव्यातील काही अनधिकृत शाळेमध्ये वार्षिक ४० हजार रुपये इतकी फी आकारली जात आहे.


शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये ४० अनधिकृत शाळांवर एफ.आय.आर. दाखल झाला होता. त्यानंतर वर्ष २४-२५ मध्ये नवीन २३ अनधिकृत शाळा चालू झाल्या आहेत. त्यामुळे दिवा शहरात एकूण ६३ अनधिकृत शाळा सुरू आहेत, परंतु शासनाने फक्त २९ एफआरआय दाखल केले आहेत. संघटनेमार्फत अनधिकृत शाळा त्वरित बंद व्हाव्यात. या करिता मुंबईतील एका उच्च न्यायालयात देखील दाद मागितली आहे. कोर्टात केस सुरु असून लवकरात लवकर निकालाची अपेक्षा आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

दिवा शहरातून अनेक विद्यार्थी लोकल मार्फत प्रवास करून जवळील शहरातील शाळेत शिक्षण घेत आहेत. दिवा शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहरात शाळा, महाविद्यालय अधिक प्रमाणात हवे आहेत. ठाणे - कळवा - मुंब्रा येथे ठाणे महापालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा ज्या प्रमाणे सुरु करण्यात आल्या आहेत, त्याच धर्तीवर दिवा शहरातही ठाणे महापालिकेने इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु कराव्यात, जेणेकरून अनधिकृत शाळेमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याची वेळ येणार नाही, अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. पत्रकार परिषदेला मेस्टा संघटनेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष नरेश पवार, खजिनदार उत्तम सावंत, दिवा अध्यक्ष साईनाथ म्हात्रे, सचिव स्वप्निल गायकर आदी उपस्थित होते.

# रस्ता रुंदीकरणात बाधित इमारतीच्या बांधकामावर निष्कासनाची धडक कारवाई

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१२, डोंबिवली (ठाणे) :** महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड व अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांचे निर्देशानुसार, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे उपायुक्त अवधुत तावडे यांचे मार्गदर्शनाखाली १०/ई प्रभागाचे सहा. आयुक्त चंद्रकांत जगताप यांनी डोंबिवली (पूर्व) येथील स्टार कॉलनी ते समर्थ चौक या २४.०० मी. रस्ता रुंदीकरणात बाधित होत असलेल्या ओम रेसिडेन्सी या तळ + ४ मजली इमारतीच्या बांधकामावर निष्कासनाची कारवाई काल सुरु



केली. सदर इमारतीमध्ये १६ सदनिका धारक व ६ गाळेधारकांना नोटीसा देवून इमारत रिकामी करण्यात आली होती.

ही कारवाई अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागातील कामगार, महापालिका पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या मदतीने आणि हाय जॉ क्रश मशीन, १ पोकलेन व १० मजूर यांच्या सहाय्याने करण्यात येत आहे. सदर कारवाई आजही सुरु राहणार असल्याची माहिती १०/ई प्रभागाचे सहा.आयुक्त चंद्रकांत जगताप यांनी दिली आहे.

# अक्षराज

४ | बुलडाणा, शुक्रवार, दि.१३ डिसेंबर २०२४ | संमिश्र

## लासलगाव येथील शिष्टमंडळाने घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**
**दि.१२, विंचूर (नाशिक) :** भारतीय किसान संघाच्या वतीने जिल्हाधिकारी नाशिक यांच्याकडे सोयाबीन खरेदी बाबत तसेच नाफेडने केलेल्या कांदा खरेदी बाबत चर्चा झाली. यावेळी नानासाहेब पाटील संचालक नाफेड, रामदास पाटील जिल्हाध्यक्ष भारतीय किसान संघ, चंद्रकांत चव्हाण, गणपतराव केदार, सुरज कोकणे आदी उपस्थित होते.

नाशिक जिल्ह्यात सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न झाले आहे. शासनाने जो सोयाबीन खरेदीचा निर्णय घेतला तो स्वागता योग्य आहे. पण प्रत्यक्षात त्या खरेदी प्रक्रियेत अत्यंत त्रुटी असल्यामुळे बऱ्याच तालुक्यात सोयाबीन खरेदीला सुरुवात झालेली नाही.काही तालुक्यात खरेदी चालू झाली आहे. परंतु तेथे अनेक अडचणी आहेत, त्या अडचणी दूर करण्यात आल्या नाही तर ही फक्त घोषणाच होईल. प्रत्यक्षात अमलात येणार नाही. भारतीय किसान संघाची मागणी आहे की, ह्या अडचणी लवकरात लवकर दूर कराव्यात अथवा भारतीय किसान संघ आंदोलनाचा पवित्रा घेईल.

**भारतीय किसान संघाच्या मागण्या खालील प्रमाणे आहेत.**

- सरकारने आर्द्रता १५ टक्के असेल तरी खरेदी केले जाईल असे जाहीर केले. पण प्रत्यक्षात असे होत नाही. उत्तर मिळते की, जीआर अजून उपलब्ध झालेला नाही. तो जीआर लवकर मिळावा, ग्रेडर खरेदी केंद्रावर उपलब्ध करावे. ग्रेडर गोडाऊन वर उपलब्ध असतात. सोयाबीन खरेदी केल्यावर पॅकिंग करून गोडाउन वर गेल्यावर रिजेक्ट केले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. वाहतुकीचा खर्च पूर्ण वाया जातो व नाईलाजास्तव शेतकऱ्यांना सोयाबीन कमी दरात व्यापाऱ्यांना द्यावे लागते. म्हणून ग्रेडर खरेदी केंद्रात असावे. नैताळे येथे असलेल्या खरेदी केंद्रात असे आढळून आले की, एकूण ११६७ शेतकऱ्यांचे कागदपत्रे जमा झाले आहे. पण फक्त तीनशेच शेतकऱ्यांचे रजिस्ट्रेशन झाले आहे. चौकशी केली असता, अशी माहिती मिळाली की, सॉफ्टवेअर व्यवस्थित ऑपरेट होत नाही. त्यामुळे नोंदी लवकर होत नाही. दिवसातून १० ते २० नोंदी होतात. शासनाने १५ डिसेंबर ही सोयाबीन खरेदीसाठी अंतिम नोंदणी तारीख दिली आहे. अशा पद्धतीने जर नोंदणी झाली तर, अनेक शेतकरी या योजनेपासून वंचित राहतील. त्यामुळे सोयाबीन खरेदीसाठी नोंदणीची मुदत एक महिना वाढवून मिळावी. तालुक्यात खरेदी केंद्रांची संख्या खूप कमी असल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे खरेदी केंद्र वाढवावेत. एनसीसीएफचे क्यू आर कोड अजून उपलब्ध नाहीत. हाताने लिहून चिठ्ठी गोणीत टाकली जाते. शेतकऱ्याचे नावाची चिठ्ठी हाताने लिहून टाकले जाते.गोडाऊन येथे ग्रेडर ताटामध्ये शेतमाल घेऊन चेक करतो. त्याच्याकडे कुठल्याही प्रकारचे यंत्र उपलब्ध नाहीत व ग्रेडर प्रशिक्षित नाहीत असे समोर आले आहे.सोयाबीन मध्ये पंधरा टक्के डाळ असल्यास ते नाकारले जाते, त्याची मर्यादा वाढवुन मिळावी. गोडाऊन परिसरात सिक्युरिटी गार्ड नसल्यामुळे उशीर झाल्यास वाहन परत आणावे लागते. त्यामुळे वाहतूक खर्च वाढतो. सिक्युरिटी उपलब्ध करावे. वाहतुकी खर्चा संदर्भात अजून कुठलाही निर्णय घेण्यात न आल्यामुळे खरेदी केंद्रात संभ्रम आहे. जी खरेदी चालू आहेत त्यांची माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न व्हावेत.

या मागण्यांसह नाफेडच्या माध्यमातून खरेदी केलेला कांदा त्याबाबत जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा करून माहिती घेतली. सोयाबीन केंद्र खरेदी केंद्र त्यात असलेल्या अडचणी व कांदा खरेदीमध्ये उपस्थित झालेल्या प्रश्नाबाबत शासनाकडे आपल्या भावना कळवल्या जातील. असे आश्वासन जिल्हाधिकारी यांनी शिष्टमंडळाला दिले. तसेच भारतीय किसान संघाचे सुरज कोकणे यांनी याबाबत मा. मुख्यमंत्रीची वेळ घेणार आहेत अशी माहिती दिली.

## सर्विस रोड, अंडरपासच्या मागणीसाठी धाराशिवकर रस्त्यावर

### डी-मार्ट समोर जोरदार रास्तारोको; राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक ठप्प

**अक्षराज : संगीता वनकळस**
**दि.१२, धाराशिव :** अपघाताध्ये सर्वसामान्यांचे जाणारे बळी रोखून वाहतूक सुरळीत व्हावी याकरिता सर्विस रोड व अंडरपासच्या मागणीसाठी निवेदन देऊन पाठपुरावा करुन तसेच आंदोलन करुनही एनएचएआय व आयआरबीने टाळाटाळ केल्यामुळे लोकांना जीव गमवावा लागत आहे. दोन दिवसांपूर्वीच शालेय विद्यार्थ्याला घरी जात असताना अपघातात जीव गमवावा लागला.



त्यामुळे संतप्त पालक व नागरिकांनी गुरुवारी धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर गुरुवार, दि.१२ डिसेंबर २०२४ रोजी डी-मार्टसमोर रास्ता रोको आंदोलन करुन एनएचएआय व आयआरबीच्या कारभारावर रोष व्यक्त केला.

कंपनीवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होत नाही. तोपर्यंत रास्तारोको सुरुच ठेवणार अशी आक्रमक भूमिका आंदोलकांनी घेतली. तर काहींनी रस्ता उखडून टाकण्याचा इशाराही यावेळी दिला. आंदोलनामुळे रस्त्याच्या दुतर्फा वाहनांच्या रांगा लागून एक तासाहून अधिक काळ वाहतूक ठप्प झाली होती. एनएचएआयच्या वतीने २५ डिसेंबरपर्यंत सर्विस रोडचे डांबरीकरण पूर्ण करण्याचे लेखी कळविल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

धाराशिव शहरातील डी-मार्ट ते आयुर्वेद कॉलेजपर्यंत राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजुला सर्विस रोडचे काम सुरु करण्यात आलेले आहे. या मार्गावर पोदार शाळा, डी-मार्ट आणि नागरी वसाहत असल्यामुळे मोठी वर्दळ असते.

सर्विस रोड करण्यापूर्वी सिमेंट-कॉंक्रिटच्या नाल्या बनविण्यात येत आहेत. या कामापूर्वी सर्विस रोडसाठी नियमानुसार जागा सोडणे आवश्यक आहे. परंतु विविध ठिकाणी सर्विस रोडची रुंदी कमी दिसून येते. त्याचप्रमाणे पोदार शाळेजवळ विकास नगर येथे व जुना उपळा रोड येथे महामार्गाच्या दोन्ही बाजूने लहान चारचाकी वाहने जातील असे दोन अंडरपास करणे गरजेचे असताना त्याकडे विविध तांत्रिक कारणे देऊन विलंब व टाळाटाळ केली जात आहे.हे काम पूर्ण झाल्यास दोन्ही बाजूने पोदार शाळेमध्ये ये-जा करणार्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना तसेच डी-मार्ट व जुना उपळा रोडकडे सुरक्षितपणे ये-जा करणे सोयीचे होऊन व जीवितहानी होणार नाही.

याकरिता शिवसेना तसेच नागरिकांच्या वतीने वेळोवेळी निवेदन देऊन सर्विस रोड व अंडरपासच्या मागणीसाठी पाठपुरावा केला जात आहे. परंतु याकडे दुर्लक्ष केले जात असल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढतच चालले असल्याचे दिसत आहे. दोन दिवसांपूर्वीच भरधाव वेगाने जाणार्या ट्रकने चिरडल्यामुळे सायकलवरुन घराकडे जाणार्या विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झाला. त्यामुळे संतप्त पालक व नागरिकांनी जिल्हाधिकार्यांना निवेदन देऊन आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

यावेळी मसुद शेख, खलील सय्यद, उमेश राजे, पृथ्वीराज चिलवंत, सोमनाथ गुरव आदींनी मनोगत व्यक्त करताना एनएचएआय व आयआरबीच्या कारभारावर सडकून टिका करत काम तात्काळ पूर्ण करण्याची मागणी केली. धनंजय शिंगाडे यांनी अपघाताच्या घटना अत्यंत दुर्दैवी असून वेळ आली तर न्यायालयात जावू अशी भूमिका घेतली.

**जमिनी विकून आयआरबीला पैसे देऊ, काम पूर्ण करा -**

एनएचएआय व आयआरबीच्या चुकीच्या धोरणामुळे नागरिकांसह शाळकरी मुलांना जीव गमवावा लागत आहे. त्यामुळे झोपेचे सोंग घेतलेल्या कंपनीच्या ढिसाळ कारभाराचा आम्ही निषेध करतो. आरआयबीकडे पैसे नसतील तर आम्ही जमीन, शेती विकून पैसे पुरवू, पण हे काम तातडीने पूर्ण करुन लोकांचे जीव वाचवा, अशी प्रतिक्रिया एका पालकाने आंदोलनस्थळी व्यक्त केली.

**महिलांचा आंदोलना दरम्यान आक्रोश -**

आंदोलनात विद्यार्थ्यांसह महिला पालक देखील मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. दोन दिवसांपूर्वी अपघातात विद्यार्थ्याने जीव गमावल्यामुळे आधीच संतप्त झालेल्या महिलांनी आंदोलनस्थळी आक्रोश व्यक्त केला. त्यामुळे आंदोलनात सहभागी पालकांचे डोळेही पाणावले होते.

**..तर काम पूर्ण होईपर्यंत महामार्ग अडविणार ! -**

ट्रकचालक मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत होता. त्यास पोलिसांनी अटक का केली नाही, असा संतप्त सवाल पालकांनी केला. १५ दिवसांत काम पूर्ण न झाल्यास संपूर्ण महामार्ग अडवून ठेवू. यापुढे असे पाऊल उचलू की त्यांना हे कामच पूर्ण करावे लागेल, असा इशारा देत उपळा (मा) गावच्या सरपंचांनी टोल नाके बंद करण्याची मागणी ही केली.

## बंद शौचालये सुरू केल्याबद्दल मुख्याधिकारी फड यांचा सत्कार

### मनसे विद्यार्थी सेनेच्या पाठपुराव्याला यश

**अक्षराज : राजेश पुरी**
**दि.१२, कळंब (धाराशिव) :** वार्ड क्रमांक ११, नगर परिषद शाळा क्रमांक ३ व सांजा रोड जवळील शौचालय बंदावस्थेत होती. त्यामुळे परिसरातील नागरिकांना शौचास जाण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. याबाबत या परिसरातील नागरिकांनी मुख्याधिकारी यांच्याकडे दि.२५ नोव्हेंबर रोजी एका निवेदनाद्वारे सदरील शौचालये सुरू करण्याची मागणी केली होती. तत्पर मुख्याधिकारी वसुधा फड यांनी वरील ठिकाणची शौचालये नागरिकांना वापरासाठी सुरू करून दिली आहेत.

त्यामुळे या भागातील नागरिकांच्या वतीने महिलांनी मुख्याधिकारी फड यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गुरुवार, दि.१२ डिसेंबर रोजी सत्कार केला. नगर परिषदेच्यावतीने बांधलेली शौचालय ही फक्त शोभेची वस्तू बनली होती. त्याचा वापर करता येत नसल्यामुळे या परिसरातील नागरिकांची अडचणी व कुचंबणा होत होती. त्यामुळे ती शौचालय तात्काळ सुरू करावीत, अशी मागणी केली होती.



अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्यावतीने जिल्हाध्यक्ष निलेश जाधव यांनी एका निवेदनाद्वारे मुख्याधिकाऱ्यांना दि.२५ नोव्हेंबर रोजी दिला होता. महिला व विद्यार्थीनी यांना शौचास जाण्यास कुठलाही मार्ग नसल्यामुळे त्यांना नाईलाजास्तव उघड्यावर शौचास जावे लागत होते. तर सांजा रोड येथे शौचालय चालू अवस्थेत आहे. परंतु त्या ठिकाणी पाणी व स्वच्छता नसल्यामुळे या ठिकाणी नागरिक जाण्यास मज्जाव करीत होते. त्या ठिकाणी पाणी व एका व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली आहे. वरील ठिकाणांची शौचालये सुरु करून नागरिकांची होणारी गैरसोय. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष निलेश जाधव यांच्यासह प्रदेश कार्यकारणी सदस्य अभिजीत पतंगे, अभिषेक कुऱ्हाडे, आशिष कुऱ्हाडे, रोहित जाधव, गीता पवार, रेश्मा जाधव, अरुणा घोडके, मनीषा देवकर, नंदा जाधव, लता जाधव, शरद पवार रुक्मिणी जाधव यांच्यासह या परिसरातील महिला व पुरुष उपस्थित होते.

## थोडक्यात

### हाय सिक्युरिटी नंबरप्लेट बसविण्याचे कल्याण आरटीओ चे आवाहन

**अक्षराज : जे.के.पोळ**
**दि.१२, कल्याण (ठाणे) :** राज्याच्या परिवहन आयुक्तांनी दिलेल्या निर्देशानुसार कल्याण उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील दि.०१ एप्रिल २०१९ पूर्वीच्या नोंदणीकृत वाहनांवर हाय सिक्युरिटी नंबरप्लेट बसविणे बंधनकारक असून वाहन चालकांनी ३१ मार्च २०२५ पूर्वी ही नंबर प्लेट बसवावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी केले आहे. राष्ट्रीय सुरक्षा, वाहनांमुळे होणारे गुन्हे कमी व्हावेत, छेडछाड, बनावटगिरी रोखण्यासाठी तसेच रस्त्यांवर चालणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांची ओळख पटविण्यासाठी या व अशा अनेक गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी मोटार वाहनांवरील हाय सिक्युरिटी नंबरप्लेट बसविणे अत्यावश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने देखील सर्व मोटार वाहनांवर अशा नंबरप्लेट बसविण्याबाबत निर्देश जारी केले आहेत. राज्यात सन २०१९ पासून नव्या उत्पादित वाहनांना (एचएसआरपी) नंबरप्लेट सक्तीची केली असून वाहनाला ही नंबरप्लेट एकदा लावल्यानंतर ती पुन्हा काढता येत नाही. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने बनविण्यात आलेली नंबर प्लेट टॅम्परप्रुफ असते. ही नंबरप्लेट ॲल्युमिनियम मिश्र धातूपासून बनविलेली असते. या नंबरप्लेटवर निळ्या रंगाच्या चक्राचे होलोग्राम व वाहन क्रमांकाच्या काळ्या तिरप्या ओळीत खछ अशी अक्षरे लिहिलेली असतात.

त्याकरिता मे. रियल माझोन इंडिया एजन्सीची नियुक्ती केली असून त्यासाठी लागणारे शुल्क निर्धारित केले आहे. दुचाकी आणि ट्रॅक्टर: रु.४५०/-, तीन चाकी: रु.५००/-, हलकी मोटार वाहने/ पॅसेंजर कार/ मिडियम कमर्शियल वाहन/ अवजड कमर्शियल वाहन आणि ट्रेलर/ कॉम्बिनेशन: रु.७४५/- हे शुल्क निर्धारित केले आहे. वरील सर्व चार्जेस जीएसटी वगळून आहेत. नियुक्त केलेली एजन्सी आरटीओ कार्यालयांतर्गत येणाऱ्या क्षेत्रात आपले फ्रँचायसी सुरु करून वाहनांना नंबरप्लेट लावण्याचे काम करणार आहे. याबाबतची माहिती व निर्देश एचएसआरपी बुकिंग पोर्टल लिंक लवकरच महाराष्ट्र मोटार वाहन विभागाच्या https://transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येणार आहे. परिवहन विभागाने दि.३१ मार्च २०२५ पर्यंत जुन्या वाहनांना एचएसआरपी नंबरप्लेट लावणे अनिवार्य केले आहे. परिवहन विभागाच्या सूचनेनुसार लवकरच सर्व जुन्या वाहनांना त्यांची कागदपत्रे तपासून संबंधित एजन्सीकडून एचएसआरपी नंबरप्लेट लावून मिळणार आहे, असे कल्याण उप प्रादेशिक परिवहन अधिकारी बारकुल यांनी कळविले आहे.

### रस्ताने घेतले परत एकदा मोकळा श्वास



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**
**दि.१२, डोंबिवली (ठाणे) :** सध्या संपलेल्या निवडणूक नंतर प्रशासन हे अधिक आक्रमक झालेला पाहायला मिळाले. याचे कारण डोंबिवली पूर्व स्टेशनला लागून असलेले रस्त्यांवर दुकानदार आणि फेरीवाले हे अतिक्रमण मुळे लोकांना ये जा करण्यास त्रास होत होता. त्याचबरोबर ग प्रभाग इतर ठिकाणी रस्त्याचे खोदकामुळे नागरिक व वाहन चालवणारे वाहतूक कोंडी पासून त्रस्त असल्याने महापालिका आयुक्तांनी पर्याय जागा हे मोकळ करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने

महापालिकेचे परिमंडल ०२ अनाधिकृत बांधकाम विभागाचे उपायुक्त अवधूत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली ग प्रभागाचे सहाय्यक आयुक्त संजय कुमावत यांनी पाहणी केल्यानंतर स्टेशन परिसर मध्ये बसलेले बेकायदेशीर फेरीवाले आणि अतिक्रमण केलेले दुकानदारवर कडक कारवाई करण्यात आले. त्याचबरोबर सहाय्यक आयुक्त संजय कुमावत सोबत डोंबिवली स्टेशन सुरक्षा बलाचे सहाय्यक निरीक्षक सुहास मनोहर मुंबई वरून येणारे प्रवासी ते ही त्रस्त झाल्याने यांचे संयुक्त कारवाई स्टेशन परिसरामध्ये करण्यात आले.

या धडक कारवाई करताना जमलेले नागरिक व प्रवासांनी अशी कार्यावही मुळे वाहतूक कोंडी व अडथळा नसल्याने कुठेतरी रस्ता मोकळा घेतलेले पाहायला मिळाले. सहाय्यक आयुक्त ग प्रभाग क्षेत्राचे संजय कुमावत मनुष्यबळाचे कम तरता असून सुद्धा असे कारवाई पुढे होत राहण्याचे आश्वासन त्या ठिकाणी जमलेल्या नागरिकांना दिले.

### डहाणू तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतींचे भूमिपूजन



**अक्षराज : निलेश कासट**
**दि.१२, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र धुंदलवाडी व धानिवरी येथील मुख्य इमारतीचे बांधकाम भूमिपूजन गुरुवार, दिनांक १२ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले. धुंदलवाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत जीर्ण झाल्याने गेल्या अनेक वर्षांपासून हे आरोग्य केंद्र बहारे येथील ग्रामपंचायत नजीक उपकेंद्रात सुरु आहे. या ठिकाणी जागा ही अपुरी असल्याने रुग्णांची गैरसोय होत होती. त्यातच धुंदलवाडी येथे आश्रम शाळा व आजूबाजूला लोकवस्ती असल्याने धुंदलवाडी चे प्राथमिक आरोग्य केंद्र हे गावात असावे. अशी मागणी होत होती.

अखेर जुन्या प्राथमिक आरोग्य केंद्रातच्या जागेत च नवीन इमारती चे बांधकामाचे उद्घाटन करण्यात आले. तर धानिवरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत ही लहान असल्याने वाढत्या रुग्णांची संख्या असल्याने सेवा देण्यात अडचणी येत असल्याने नव्याने इमारत बांधण्यात येणार असून या दोन्ही इमारतींच्या बांधकामासाठी १५ व्या वित्त आयोगातून अनुक्रमे १ कोटी १६ लाखांचा निधी इतका मंजूर करण्यात आला आहे. या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती बांधकाम उद्घाटन प्रसंगी डहाणू मतदार संघाचे आमदार विनोद निकोले, जि.प.अध्यक्ष प्रकाश निकम, कृषी व पशुसंवर्धन सभापती संदीप पावडे, बांधकाम व अर्थ समिती सभापती काशिनाथ चौधरी, पं.स. डहाणू सभापती-प्रविण गवळी, जि.प.सदस्य शैलेश करमोडा, जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष चौधरी, तालुका आरोग्य अधिकारी, सरपंच, सदस्य,आशा स्वयंसेविका व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.